दि. ०५.०४.२०२२

# —: प्रेसनोट :—

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | २३/२०२२ |
| ३ | कलम | ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| ४ | आरोपीताचे नाव व कार्यालय | १) राजेंद्र सहदेव नाईक, वय ५४ वर्षे, नोकरी — भाडे संकलक, के/पुर्व वार्ड, गुंदवली आझाद रोड, अंधेरी पुर्व, मुंबई<br>२) मोहन रावजी ठिक, वय ५४ वर्षे, नोकरी — लेबर, के/पुर्व वार्ड, गोंदवली आझाद रोड, अंधेरी पुर्व, मुंबई |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ३,००,०००/— |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ३,००,०००/— |
| ७ | हस्तगत केलेली लाचेची रक्कम | रु. ३,००,०००/— |
| ८ | थोडक्यात माहिती | तक्रारदार यांच्या राहत्या घरास लागुनच पुढील बाजुस त्यांचे दुकान आहे. त्यांचे घर हे त्यांची पत्नीचे नावे असुन दुकान हे तक्रारदार यांच्या नावे आहे. सदर दुकान हे सन १९८५ मध्ये एसआरए मधुन रितसर फी भरुन तक्रारदाराने स्वत:च्या नावे कमर्शिअल करुन घेतले होते. त्यानंतर तक्रारदार यांनी सन २०२० मध्ये मुंबई महानगनपालिकामधुन एनेक्चर—२ काढले, त्यामध्ये तक्रारदार यांना त्यांच्या दुकानाची नोंद दिसुन आली नाही.<br>तसेच तक्रारदार यांची पत्नी यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या सागबाग स्नेहनगर एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेचे परि—२ मध्ये नाव समाविष्ट करणेसाठी प्रकल्प अधिकारी (वसाहत) के/पूर्व, बीएमसी यांचे कार्यालयात अर्ज केला होता. सदर अर्जाच्या सुनावणीअंती तक्रारदार यांच्या पत्नी यांचे अपील हे अमान्य करण्यात आले होते. तसेच तक्रारदार यांनी दुकानासंदर्भात एसआरए योजनेत व्यवसायीक दुकानाची नोंद पुर्ववत करण्याकरीता दुकानाची कागदपत्र जोडुन दिनांक ०६/०१/२०२२ रोजी अंधेरी के/पूर्व विभाग, बीएमसी येथे अर्ज केला होता.<br>लोकसेवक क्र. १ यांनी तक्रारदार यांना त्यांच्या पत्नीच्या घरासंदर्भातील अपीलाबाबत ऑर्डर बदलुन देणेकरीता व तक्रारदार यांच्या नावे असलेल्या दुकानाची नोंद कमर्शियल म्हणून पुर्ववत करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे रु. ३,००,०००/— लाख लाचेची मागणी केली. तक्रारदारास लोकसेवकास लाच दयावयाची इच्छा नसल्याने तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे दि. १८.०२.२०२२ रोजी प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br>दि. २१.०२.२०२२ रोजी केलेल्या पडताळणीत यातील आरोपी लोकसेवकाने तक्रारदार यांना पत्नीच्या घरासंदर्भातील ऑर्डर बदलुन देण्यासाठी व तक्रारदार यांच्या नावे असलेल्या दुकानाची नोंद पुर्ववत करण्यासाठी तक्रारदाराकडे रू. ३,००,०००/— रक्कमेची लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने. दिनांक. ०४.०४.२०२२ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक क्र. १ यांनी आरोपी लोकसेवक क्र. २ यांना तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रक्कम स्विकारण्यास सांगितलेवरुन आरोपी लोकसेवक क्र. २ यांनी ती स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणुन आरोपी लोकसेवक क्र. १ व २ यांना ताब्यात घेवुन त्यांच्या विरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.<br>सदर कारवाई दरम्यान आलोसे यांच्या कार्यालयाची झडती घेतली असता, लाचेच्या रक्कमेव्यतिरिक्त रू. ३,००,०००/— रोख रक्कम मिळून आलेली असून सदर रक्कम पुढिल तपासकामी जप्त करण्यात आलेली आहे. |

सहाय्यक पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

05/04/2022

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०

संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in

ईमेल— १) acbwebmail@mahapolice.gov.in

२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.

ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४

दुरध्वनीक्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००

Scanned with CamScann